महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotiskill@gmail.com

जावक क्र. महाज्योती/नागपूर/२४३ /२०२३-२४ दि.०६.०२.२०२४

(MPSC)

## -:परिपत्रक:-

**विषय: महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) २०२३-२४ परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता तिसऱ्या प्रतिक्षा यादीबाबत.**

महाज्योतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) २०२३-२४ परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता निवड झालेल्या विद्यार्थ्यांची प्रारूप निवड यादी तसेच पहिली व दुसरी प्रतिक्षा यादी यापूर्वी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तथापि निवड यादी व प्रतिक्षा यादीतील काही विद्यार्थी रुजू न झाल्यामुळे अश्या विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करून विद्यार्थ्यांची तिसरी प्रतिक्षा यादी यासह प्रसिद्ध करण्यात येत आहे. तिसऱ्या प्रतिक्षा यादीनुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या प्रशिक्षण केंद्रावर दि.०६.०२.२०२४ ते दि.११.०२.२०२४ या कालावधीपर्यंत रुजू व्हावे तिसऱ्या प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण केंद्रावर हजर राहून दिलेल्या कालावधीत प्रवेश न घेतल्यास अश्या विद्यार्थ्यांची निवड रद्द करून विद्यार्थ्यांची चौथी प्रतिक्षा यादी लावून विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.

**महत्वाचे: काही विद्यार्थ्यांची मूळ निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करतांना प्रशिक्षण केंद्राची निवड केलेली नव्हती. त्यामुळे अशा उमेदवारांचा मूळ निवड व प्रतिक्षा यादीत समावेश होवू शकला नव्हता. प्रतिक्षायादी प्रसिध्द करण्यापूर्वी सर्वच विद्यार्थ्यांना प्रशिक्षण केंद्र निवडण्याची सुविधा पुन्हा नव्याने उपलब्ध करुन देण्यात आली होती. ही पार्श्वभूमी विचारात घेता काही प्रवर्गाच्या बाबतीत मूळ अंतिम निवड गुण (Cut-Off Marks) पेक्षा प्रतिक्षायादीतील अंतिम निवड गुण (Cut-Off Marks) हे जास्त असू शकतात, ही बाब विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.**

(स्वा)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन
व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर